अखिल भारतीय मराठी
साहित्य महामंडळाचे

# अक्षरयात्रा

२०२१ - २०२२

# समकालीन मराठी कादंबरी

संपादक:
डॉ. दादा गोरे

Scanned with OKEN Scanner

- विखंडीत जगण्याला कवेत घेणारा आकृतिबंध : दंशकाल
  - डॉ. कविता मुरुमकर / १८२
- उत्तर-आधुनिक काळातील उपभोगाच्या हव्यासाचे उपनिषध : ९६ मेट्रोमॉल
  - डॉ. गोविंद काजरेकर / १८९
- प्रशासन व्यवस्थेचा पंचनामा : पिढीजात
  - डॉ. कैलास अंभुरे / १९४
- ऊसतोड मजुरांच्या लोकजीवनाची संघर्षगाथा : लेकमात
  - डॉ. गणेश मोहिते / २०३
- ब-बळीचा : कृषिसंस्कृतीच्या मूल्यऱ्हासाचीर शोकात्म कथनमीमांसा
  - डॉ. केशव तुपे / २११
- चाळेगत : जागतिकीकरणामुळे उद्ध्वस्त भू-सांस्कृतिक जगण्याचे कथन
  - डॉ. रामचंद्र काळुंखे / २१७
- वीजेने चोरलेले दिवस : शेतीव्यवस्थेच्या पडझडीचा आंतरछेद
  - डॉ. दत्ता घोलप / २२७
- आत्मभान जागृत झालेल्या वृद्ध कलावंताची संघर्षगाथा : पिंडीवरचे विंचू
  - डॉ. अनिरुद्ध तुकाराम मोरे / २३२
- कोबाल्ट ब्ल्यू : निळ्या प्रेमाची विलक्षण कथा
  - डॉ. समिता जाधव / २४२
- आधिवास : एक स्त्रीसूक्त
  - भगवंत क्षीरसागर / २५३
- अस्तित्व शोधाचा प्रवास : सरोवर
  - डॉ. विद्या सुर्वे बोरसे / २५९
- काळवाटा... अस्वस्थ आत्मपर कादंबरी
  - माधुरी चौधरी / २६३
- आदिवासी स्त्रीची संघर्षगाथा : मासोली
  - डॉ. शशिकांत पाटील / २६८
- तणस : नवभांडवली व्यवस्थेचा तळठाव
  - नीलेश केदारी शेळके / २७६
- टिश्यू पेपर : हॉटेल जगताचे वास्तव मांडणारी कादंबरी
  - डॉ. अरुण कोळेकर / २८२
- प्रतिकात्मकतेतून मानवमुक्तीचा ध्यास धरणारी कादंबरी : पिपिलिका मुक्तिधाम
  - बाबाराव मुसळे / २९१


Scanned with OKEN Scanner

# ऊसतोड मजुरांच्या लोकजीवनाची संघर्षगाथा : लेकमात

- डॉ. गणेश मोहिते

विजय जावळे हे मराठवाड्यातील ग्रामवास्तवाचे नेटके भान असणारे समकालीन पिढीतील महत्त्वाचे लेखक म्हणून परिचित आहेत. मराठी भाषा उद्‌गम, उत्पत्तीच्या दृष्टीने ऐतिहासिक असणाऱ्या बीड जिल्ह्यात वाङ्‌मयीन परंपरेला पुढे घेऊन जाणाऱ्या आधुनिक लेखनपरंपरेत जावळे यांचे स्थान ठळक आहे. समकालीन वास्तवाचं उभं-आडवं भेदक दर्शन घडविण्याचे सामर्थ्य असणारा सशक्त कथात्मलेखन करणारा हा लेखक प्रसिद्धीपरान्मुख आहे. गेली दोन दशकं सातत्यपूर्ण लेखन प्रक्रियेशी जोडलेले असूनही ते अजूनही अनेकांना नवखे आहेत. स्वभावाने मितभाषी असून वाङ्‌मयीन निर्मितीपलीकडे बाह्यविश्वाशी अधिक संबंध न ठेवणारा हा लेखक फक्त लेखनातून भेटतो. साधारणत: वीस वर्षांपूर्वी 'लेकमात' ही प्रकृतीने 'ऱ्हस्व' कादंबरी 'मौज' दिवाळी अंकातून प्रसिद्ध झाली होती. तेंव्हापासून त्यांच्या लेखनाकडे जाणकारांचे लक्ष होते.

दरम्यानच्या काळात त्यांचे 'मिरगीपेर' (२००३), 'रीतगांव' (२०११), 'खांदेमळणी' (२०१४) इत्यादी कथासंग्रह, 'भाऊबंद' (२००६), 'चारखणी' (२००९) या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. अलीकडे बहुप्रतीक्षित 'लेकमात' (२०२०) ही कादंबरी प्रकाशित झाली. अस्सल, दर्जेदार कथात्म लेखनात सातत्य असणारे लेखक मराठवाड्यात कमीच आहेत. जे अपवादभूत नावे या दोन दशकांत दिसतात; त्यात विजय जावळे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. बीड जिल्ह्याच्या समकालीन राजकारण, समाजकारणासह ग्रामवास्तवाचे बहुअंगी नेटके दर्शन हा लेखक कथात्म साहित्यातून घडवतो. ऊसतोड मजुरांच्या शोषणाची परवड समजून घ्यायची असेल;तर त्यांचे कथात्म लेखन वाचले पाहिजे. बीड जिल्हा अवर्षणप्रवण क्षेत्रात येतो. बालघाटच्या डोंगररांगा या परिसराला निसर्ग सौंदर्य जरी बहाल करीत असल्या तरी दुष्काळापासून वाचवीत



Scanned with OKEN Scanner